**सरदार पटेल महाविद्यालयात आय. आय. टी स्पोकन टयुटोरीयल परीक्षेचे आयोजन**

मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या उच्चशिक्षण विभागाअंर्तगत विद्यार्थ्यानमध्ये डिजीटल साक्षरता यावी या उद्देशाने वेगवेगळे उपक्रम राबवित असतात. त्या अनुशंगाने आय आय टी स्पोकन ट्युटोरीयल मुंबई तर्फे आय. आय. टी. स्पोकन ट्युटोरीयल हा उपक्रम सुरू करण्यात आला या उपक्रमाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यामध्ये डिजीटल साक्षरतेबद्दल जनजागृती यावी याकरीता वेगवेगळे संगणक साक्षरतेचे अद्यावत कोर्सेस चालवीले जातात त्यासाठी आ य. आय. टी. मुंबई तर्फे प्रत्येक जिल्हयाला एक नोडल केंद्र दिलेले आहे. सरदार पटेल महाविद्यालय हे मागील दहा व र्षा पासुन जिल्हा नोडल केंद्र म्हणुन कार्य पार पाडीत आहे. या अंर्तगत मागील दहा वर्षापासुन संगणक विभाग सरदा र पटेल महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना सर्वागीक विकासाकरीता हा उपक्रम वेगवेगळ्या कोर्सेसच्या माध्यमातुन चालवीला जात आहे. त्या कोर्सेसमध्ये जावा. पायथॉन सी अकाउंटिंग, इत्यादीचा समावेश आहे. आतापर्यंत या उपक्रमाचा फायदा विभागाच्या 5 हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी घेतलेला आहे. या कोर्सेसाठी बाजारात पाच ते सहा हजार रूपये द्यावे लागतात ते सर्व कोर्सेस महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यानासाठी विनामुल्यय राबविण्यात येत आहेत. या उपक्रमाअंतर्गत राबविल्या जाणया कोर्सेसच्या माध्यमातुन अनेक विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडविलेले आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना या माध्यमातून नौकरीच्या संधी सुध्दा उपलब्ध झालेल्या आहे.

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली संगणकशास्त्र विभागातर्फे आय. आय. टी. स्पोकन ट्युटोरीयल हा उपक्रम राबविण्यात आला त्या अंर्तगत विविध कोर्सेस चालविण्या त आले त्या कोर्सेसाठी बि.एस.सी.(आय. टी.) बि. सी. सी. ए. एम.सी.ए. इत्यादी च्या विद्यार्थ्यांना मोठयाप्रमाणावर नोंदणी केली. या कार्सेसच्या कालावधी संपल्यानंतर त्या कोर्सेसाठी चार दिवसीय परीक्षेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. परिक्षेसंदर्भात मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर म्हणाले की अशा पध्दतीने उपक्रम महाविद्यालयात नेहमीच राबविले जातात त्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्याप्रमाणावर सहभागी होउन स्वःतासाठी रोजगाराची संधी उपलब्द करून घ्याव्यात त्याचबरोबर आपल्या डिजीटल ज्ञानात भर टाकावी..

संगणकशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. एस. बी. किशोर यांच्या प्रयत्नातुन आय. आय. टी. स्पोकन ट्युटोरीयल हा उपक्रम महाविद्यालयात नियीमत सुरू आहे ते नेहमीच या संदर्भात विद्यार्थी व प्राध्यापकाना मार्गदर्शन करीत असतात त्यांच्या मार्गदर्शनात संपुर्ण परीक्षेचे आयोजन करण्यात आले सदर कार्य व परीक्षेसाठी नोडल अधिकारी म्हणुन डॉ. संदिप गुड्डेल्लीवार यांनी काम पहिले तर तांत्रिक सहायक म्हणुन प्रा. नासीर शेख, प्रा. संतोष शिंदे, प्रा. गितेश बुरांडे, प्रा. निगार पठान आणी प्रा. लिना नासरे यांनी मोलाचे सहकार्य केले. सदर परीक्षेत बी. सी. ए. आणि बि. एस. सी . ( आय. टी.) अभ्यासकामातील एकुण 678- विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष सुधाताई पोटदुखे कार्याध्यक्ष अरविंद सावकार पोरेड्डीवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सर्वोदय शिक्षण मंडळाचे सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष मनोहरराव तारकुंडे, सदस्य सगुणाताई तलांडी, राकेश पटेल, जिनेश पटेल, आ. किशोर जोरगेवार, संदीप गड्डमवार, सुधाकर पोटदुखे, चंद्रशेखर वाडेगावकर यांनी उपरोक्त उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या.






